महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ ,
पुणे विभागीय मंडळ , पुणे - ४११००५

MAHARASHTRA STATE BOARD OF SECONDARY & HIGHER SECONDARY EDUCATION,
PUNE DIVISIONAL BOARD . PUNE - 411005

DIVISIONAL CHAIRMAN	DIVISIONAL SECRETARY	FAX- 020/25536761
25536722 (OFF)	25536781/82/83 / 25536712 (OFF)	Telegram-'SECBOARD' PUNE E-MAIL msecpdb@mah.nic.in.

क्र.पुविमं./शाखा ब/ उ.मा./ 2926
पुणे ४११ ००५.
दिनांक - १५/०३/२०१७

प्रति,
प्राचार्य,

विषय - उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा फेब्रवारी/मार्च-२०१७ परीक्षेच्या उत्तरपत्रिका तपासणीच्या कामकाजावर बहिष्काराबाबत.
संदर्भ - १) आपले ---------- चे पत्र
सोबत पाठविलेल्या ---------- विषयाच्या उत्तरपत्रिकेचा गठ्ठा.

उपरोक्त विषयास अनुसरुन आपणास कळविण्यात येते की, उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा फेब्रवारी/मार्च-२०१७ परीक्षेच्या ---------- विषयाच्या उत्तरपत्रिका तपासणीसाठी आपल्या कनिष्ठ महाविद्यायाकडे पाठविण्यात आल्या होत्या व आपल्या कनिष्ठ महाविद्यालयाच्या विषय शिकविणाऱ्या शिक्षकांकडून विकेंद्रित मूल्यमापन पध्दतीने तपासुन घेण्याबाबत कळवुन शिक्षकांची नांवे पाठविण्यात आली होती.

१) तथापी उपरोक्त संदर्भिय पत्राद्वारे ---------- या विषयाच्या उत्तरपत्रिकेचा गठ्ठा या कार्यालयास न तपासता परत पाठविण्यात आलेला आहे. तो आपण स्वत: अथवा आपल्या प्रतिनिधीस कार्यालयास पाठवून गठ्ठा परत घेऊन जाऊन संबंधित विषय शिक्षकांकडून उत्तरपत्रिकांचे परीक्षण करुन नियमकांकडे समीक्षणांसाठी पाठविण्याची कार्यवाही आपण स्वत: लक्ष घालून करावी.

२) उपरोक्त संदर्भिय पत्राद्वारे शिक्षकांचा कामावर बहिष्कार असल्याचे कळवून मार्गदर्शन मागविले आहे. याबाबत आपणास कळविण्यात येते की, ज्या विषयांच्या उत्तरपत्रिका आपल्याकडे आल्या आहेत त्या विषय शिक्षकांकडून उत्तरपत्रिकांचे परीक्षण करुन नियमकांकडे नियमनासाठी पाठविण्याची कार्यवाही आपण स्वत: लक्ष घालून करावी.

महाराष्ट्र खाजगी शाळातील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) नियमावली १९८१ अनूसुची अ मधील नियम क्रमांक २२ (१) मधील मुख्याध्यापक /शिक्षक/शिक्षकेत्तर कर्मचारीयांच्याकरीता विहीत केलेल्या कर्तव्यानुसार विभागीय मंडळाकडून सोपविण्यात आलेली परीक्षांच्या संदर्भातील कोणतेही काम करणे हे त्यांचे कर्तव्य ठरते. तसेच मंडळे विनीमय नियम क्र. ६७ मधील १८ नुसार विभागीय मंडळाकडून घेण्यात येणाऱ्या परीक्षांसाठी कनिष्ठ महाविद्यालय जरुर त्या सर्व सोयी व कर्मचारी वर्गाच्या सेवा देऊ करील. हे नियम पाहता आपल्या शिक्षकांकडून उत्तरपत्रिका तपासून घेणे व पुढील कार्यवाही करणे. हे नियमानुसारच आहे. सबब आपण आपल्या कनिष्ठ महाविद्यालयास तपासणीसाठी दिलेल्या उत्तरपत्रिका तपासणीचे नियोजन व व्यवस्थापन करावे.

वरीलप्रमाणे कार्यवाही न केल्यास व त्यामुळे निकाल जाहीर करण्यास उशीर झाल्यास आपल्या कनिष्ठ महाविद्यालयास मंडळे विनिमय ६६ नुसार दिलेली मान्यता मंडळ विनिमय ६७ कनिष्ठ महाविद्यालयाच्या मान्यतेसाठी शर्ती (१८) चा भंग केला म्हणून मंडळे विनिमय ६८ नुसार कनिष्ठ महाविद्यालयाची मान्यता नाकारण्याचा अधिकारी व मंडळे विनिमय ६९ नुसार मान्यता काढून घेण्याची कार्यवाही करणे मंडळास भाग पडेल याची नोंद घ्यावी.

15/3/17
विभागीय सचिव,
पुणे विभागीय मंडळ,
पुणे ४११ ००५.

प्रति,
सचिव ----------

यांना कळविण्यात येते की, आपल्या संस्थेच्या उपरोक्त कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षकांनी उत्तरपत्रिका तपासणीस नकार दिला असल्यामुळे मंडळाचे उत्तरपत्रिका तपासणीचे कामकाज वेळेत करणेबाबत आपण संबंधितास सुचना अथवा इतर कार्यवाही करुन मंडळाचे काम पूर्ण होईल यादृष्टीने कार्यवाही करावी. अथवा आपण पत्रात नमुद केल्याप्रमाणे आपल्या संस्थेच्या वरील कनिष्ठ महाविद्यालयाची मंडळाची मान्यता काढुन घेण्याबाबत कार्यवाही करावी लागेल याची नोंद घ्यावी.

प्रत माहिती व योग्य त्या उचित कार्यवाहीसाठी
मा. शिक्षण उपसंचालक, शिक्षण उपसंचालक कार्यालय पुणे विभाग पुणे.